आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. ८०लगत जोड

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – नागेंद्र कुमार पंडा

वय – ५७ वर्षे, व्यवसाय – असिसटन्ट जनरल मॅनेजर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, हेड ऑफिस मुंबई,

राहणार–ठाणे, नवी मुंबई.

**<u>आरोपीतर्फे साक्षीदार क्र.११ यांचा उर्वरित उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः</u>**

प्रश्न– ज्या खातेदारांचे पैसे खात्यांमधून काढले जात होते त्या खातेदारांना पैसे विथड्रॉ होण्यासंदर्भात बँकेने कळविले होते का?

उत्तर– ज्या वेळी खातेदारांनी तक्रार केली त्यावेळी त्याबाबत कळाले व याबाबत बँक मॅनेजर सांगू शकतो.

हे मला माहित नाही की गौतम जाधव विरुद्ध तो वडझिरे शाखा येथे बँक मित्र लागल्यापासून ते सन २०२० पर्यंत हेड ऑफिसला तक्रार आली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की मी रिजनल मॅनेजर म्हणून लागल्यापासून ते सन २०२० पर्यंत ही तक्रार सोडून गौतम जाधव विरुद्ध हेड ऑफिसला कोणी तक्रार केली होती किंवा कसे.

प्रश्न – जर एखाद्या खातेदारास बरे नसेल तर त्यांच्या वतीने त्याने नेमलेला माणूस यास पैसे काढता येवू शकतात का ?

उत्तर – काही उपवादात्मक प्रकरणामध्ये जर बँकेची खात्री झाली खातेदारास बरे वाटत नाही तर, बँकेतील कर्मचारी खातेदाराच्या समक्ष सही घेवून ते पैसे काढून घेवू शकतो.

हे म्हणणे खरे आहे की, खातेदारास कॅशमध्ये पैसे काढण्यासाठी बँकेत जाणे अनिवार्य आहे. हे मला माहित नाही की, जे बँकेतील व्यवहार झाले आहेत ते बँकेच्या कोणत्या कर्मचा–यांच्या आय.डी. वरून झाले आहेत. नि.५८ वरील ज्ञानदेव निघुट यांचा तक्रारी अर्ज मला दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, ते अर्ज अ.क्र. १ वर एम.आय.डी.सी. ऑफीस वरील शाखाधिकारी आणि अनुक्रमांक २ वर वडझिरे

बँकेच्या शाखेतील शाखाधिकारी यांना तो अर्ज अॅड्रेस केला आहे. हे मला माहित नाही की, तो अर्ज माझ्या ऑफीसला आला होता किंवा कसे ? हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल करण्यापुर्वी मी माझेकडे आलेल्या सर्व तक्रारी अर्जांचे अवलोकन केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्व तक्रारी अर्जांचे अवलोकन केल्यानंतर माझे झालेल्या समाधानावर तसेच वरिष्ठांच्या सुचनेवरून मी फिर्याद दाखल केली. बँक मधील कर्मचा–यांचे व अधिका–यांचे युनियन असते.

प्रश्न– नि.५८ वरील निघुट यांच्या अर्जामध्ये त्यांनी त्यांचे पैसे गेल्याबाबत बँक कर्मचा–यांना विचारले असता बँक कर्मचा–यांनी त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली असे नमूद आहे. हे बरोबर आहे का ?

**(सरकारी वकीलांनी आक्षेप घेताल की, सदर प्रश्न हा निघुटे यांच्याशी निगडीत आहे कारण तो अर्ज निघुट यांचा आहे व फिर्यादीचा या प्रश्नाशी काहीही संबंध नाही.)**

आरोपीतर्फे वकीलांनी सांगितले की, फिर्यादीने तक्रारी अर्जांचे अवलोकन करून फिर्याद दाखल केली आहे त्यामुळे आक्षेप घेता येणार नाही.

सदर आक्षेप पाहता सदर साक्षीदार हा केसमधील फिर्यादी असून त्यांनी तक्रारी अर्जांचे अवलोकन केल्याचे सांगितले असून व त्याआधारे आणि वरिष्ठांच्या सुचनेप्रमाणे त्यांनी फिर्याद दाखल केल्याचे सांगितले असून त्यामुळे सदर प्रश्न हा फिर्यादीशी संबंधीत नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येवून आक्षेप नामंजूर करण्यात येत आहे.

उत्तर– याबाबत मी सांगू शकत नाही.

प्रश्न– नि.५८ वरील निघुट यांच्या अर्जामध्ये गौतम जाधव व्यतिरिक्त सदर खातेदाराने विद्या मॅडम, कॅशिअर बोरूडे आणि मॅनेजर उघडे यांनी त्याच्या खात्यातून परस्पर रक्कम काढून त्याची फसवणूक केल्याचे नमूद आहे. हे बरोबर आहे का ?

उत्तर– याबाबत मी निश्चित सांगू शकत नाही.

प्रश्न– निघूट यांचे तक्रारी अर्जात विद्या मॅडम, कॅशिअर बोरूडे आणि मॅनेजर उघडे यांचे नाव असूनही तुम्ही फक्त गौतम जाधव विरूध्द का फिर्याद दाखल केली ?

उत्तर– नि.५८ वरील पोहोच पाहता तीची तारीख ०९/०८/२०२२ आहे व माझी

बदली जुलै २०२१ मध्ये झाली असल्याने व त्या अर्जावरील पोहोच ०९/०८/२०२२ रोजीची असल्याने मी त्या अर्जाचे अवलोकन करण्याचा प्रश्न नाही.

हे म्हणणे खरे आहे की, निघुट यांचा नि.५८ वरील अर्जावर शेवटच्या पानावर तारीख ०६/०३/२०२१ अशी नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, ०६/०३/२०२१ रोजी मी रिजनल मॅनेजर म्हणून रिजनल ऑफीस, अहमदनगर येथे कार्यरत होतो.

प्रश्न– नि.५८ वरील अर्जावर नमूद केलेली ०९/०८/२०२२ ही तारीख अर्ज मिळाल्याची पोहोचची तारीख नसून पोलिसांना बँकेकडून दिलेल्या प्रमाणित प्रतीची तारीख आहे ?

उत्तर– याबाबत पोलिस सांगू शकतील.

प्रश्न– नि.४४ वरील तुकाराम तिकोणे यांचा तक्रारी अर्ज त्यांनी बँक कर्मचा-यांनी त्यांची बनावट फिक्स डिपॉझीट पावती तयार करून फसवणूक केल्याचे नमूद असून तुम्ही बँक कर्मचा-यांविरूध्द फिर्याद का दाखल केली नाही ?

उत्तर– जर बँकेतील कर्मचा-यांविरूध्द काही पुरावा मिळाला तर बँकेत इंटरनल डिसीप्लीनरी अॅक्शनची सिस्टीम आहे व त्याद्वारे बँक कर्मचा-याविरूध्द अॅक्शन घेतली जाते.

प्रश्न– तुम्ही बँक कर्मचा-यांविरूध्द याबाबत काय कार्यवाही केली?

उत्तर – माझी जुलै २०२१ मध्ये बदली झाली.

अहमदनगर मधून माझी बदली मुंबई येथील हेड ऑफीसमध्ये झाली. मुंबईच्या हेड ऑफीसचे अधिकार क्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर असल्याचे मी सांगू शकत नाही. हे मी सांगू शकत नाही की, माझी बदली झाल्यानंतर बँकेने बँक कर्मचा-यांविरूध्द काही कार्यवाही केली किंवा कसे. आता मला शिवाजी साठे यांचा तक्रारी अर्ज दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्जाच्या शेवटी ०६/०३/२०२१ तारीख नमूद आहे. सदर अर्जास **ओळखीसाठी नि.९३** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, नि.९३ वरील शिवाजी साठे यांच्या अर्जामध्ये गौतम जाधव यांचेव्यतिरिक्त विद्या मॅडम, कॅशियर बोरूडे व मॅनेजर उघडे यांनी त्याची फसवणूक केल्याचा उल्लेख आहे.

प्रश्न– नि.४४ वरील अर्जात शिवाजी साठे याने त्याची ३,००,०००/– रूपयांची

फसवणूक झाल्याचा उल्लेख आहे व सरतपासात तुम्ही त्याची २,७५,०००/– रूपयांची फसवणूक झाल्याचा उल्लेख आहे याबाबत तुम्ही काय सांगू शकता ?

उत्तर– अकाउंटमध्ये रक्कम रूपये २,७५,०००/- डेबीट झाल्याची दि १७/१०/२०१९ ची नोंद आहे. ती रक्कम गौतम जाधवच्या खात्यावर जमा झाली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, नि.६६ वरील तक्रारी अर्ज सुखदेव चौधरी यांनी मार्च २०२१ मध्ये मला पाठविला होता व त्याअर्जात आरोपी गौतम जाधव व्यतिरिक्त विद्या मॅडम, कॅशिअर बोरूडे व मॅनेजर उघडे यांनी संगनमताने त्याची फसवणूक केल्याबाबत उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.६८ वरील तक्रारी अर्ज प्रमिला शेंडकर यांनी मार्च २०२१ मध्ये मला पाठविला होता व त्या अर्जात आरोपी गौतम जाधव व्यतिरिक्त विद्या मॅडम, कॅशिअर बोरूडे व मॅनेजर उघडे यांनी संगनमताने त्यांची फसवणूक केल्याबाबत उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की नि.६० वरील रंजना मोरे व दत्तात्रय मोरे यांच्या एकत्रित अर्जामध्ये गौतम जाधव ने पैशांचा अपहार केल्या बाबत उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की. नि.५३ वरील सुखदेव पवार यांचा अर्ज दिनांक ३०/०३/२०२१ रोजीचा आहे व त्यामध्ये सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया शाखा वडझिरे यांचे आर्थिक फसवणूक व गैरव्यावहाराबाबत असे विषयात नमुद आहे.

प्रश्न– सदरच्या अर्जातील विषय पाहता सदरचा अर्जाच्या तक्रार ही बॅंकेविरुध्द केली असल्याचे दिसते?

उत्तर- त्यावरुन दिसते की बॅंकेच्या अपहाराबाबत तो अर्ज आहे.

हे म्हणणे खरे आहे की नि.५३ वरील सुखदेव पवार यांचया अर्जात गौतम जाधव यांनी त्यांचे ९,२२,००० रुपयांचा अपहार केल्याचे त्या अर्जात स्पष्ट उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या अर्जात शेवटी सुखदेव पवार यांनी नमुद केलेला मजकुर की "त्यानंतर दिनांक १२/०३/२०२१ रोजी माझे सदरचे फिक्स डीपॉझिट च्या पावतीच्या खात्यावर रक्कम शिल्लक नाही असे बॅंक शाखाधिकारी विदया मॅडम यांनी मला सांगितले. अशा प्रकारे सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया शाखा वडझिरे यांनी माझी फसवणून केली आहे", हा बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की सुखदेव पवार यांच्या अर्जात "माझे सिव्हींग्ज खाते वरील ९,२२,००० ची मी दिनांक ०१/१०/२०११ रोजी फिक्स डिपॉझिट ची

पावती करण्यासाठी सांगितले असता त्या दिवशी आज साहेब नाहीत, साहेबांची सही झाली नाही अशी उडवाउडवीची कारणे सांगून मला वारंवार हेलपाटे मारण्यास लावले" असे नमुद आहे.

हे मी सांगू शकत नाही की नि.५३ वरील सुखदेव पवार यांच्या अर्जात दिनांक ०१/१२/२०१९ सुखदेव यास फिक्स डिपॉझिट ची पावती देण्यात आली व सदर रकमेची पावती त्याने दिनांक ०१/१२/२०२० रोजी रिन्यू करुन घेतली असे नमुद असल्याने सुखदेव यास त्याची फिक्स डिपॉझिट ची पावती मिळाली होती किंवा कसे. एफ.डी करण्याचे अधिकारी बँकेतील स्टाफला असते. जर व्यक्तीस एफ.डी करायची असेल तर तो बँक मधील क्लर्क किंवा कॅशियर कडे जातो. जर कॅश खात्यात जमा करायची असेल तर व्यक्ती कॅशियर शी भेटू शकतो आणि जर बँलेन्स ट्रान्सफर करायचा असेल तर बँकेतील काउंटर वरील कोणत्याही कर्मचार्याला तो भेटू शकतो. हे म्हणणे खरे आहे की कॅश जमा करण्या संदर्भात व कॅश काढण्या संदर्भातील सर्व व्यवहार बँकर पाहतो.

प्रश्न— कॅश जमा करण्या संदर्भात व कॅश काढण्या संदर्भातील सर्व व्यवहाराची जबाबदारी बँकर वर असते?

उत्तर— जर व्यवहार बँकेमध्ये होत असतील व बँकेतील कार्यालयीन वेळी होत असतील तर व बँकरशी होत असेल तर ती जबाबदारी बँकर वर असते. बँकेतील पैशांची तिजोरीचा ताबा कॅशियर किंवा इतर बँक कर्मचा-यावर असतो. हे म्हणणे खरे आहे की त्याचा ताबा बँक मित्रकडे नसतो. एफ.डी च्या पावत्यांचा ताबा हेड कॅशियर किंवा इतर बँक कर्मचा-याकडे असतो. हे मी सांगु शकत नाही की सुखदेव पवार यांचे ९,२२,००० रुपये विद्या मॅडम कॅशियर बोरुडे आणि मॅनिजर उघडे यांनी संगणमत करुन काढुन घेतले. हे मी सांगू शकत नाही सुखदेव पवार यांचे ९,२२,००० रुपये जमा झाल्याची नोंद गौतम जाधव च्या खात्यावर झाली आहे किंवा कसे.

प्रश्न— गौतम जाधव यांनी पैशे काढले आहे कींवा तिजोरीतून पैशे घेतले आहे हे चौकशी मधुन तुम्हाला उघडकीस आले आहे का?

उत्तर— चौकशी मी केली नसून चौकशी इतर अधिका-याने केली होती. सुखदेव पवार

यांच्या खात्यातील पैशांचे ट्रान्झॅक्शन कोणत्या कर्मचा-च्या आयडीवरुन झाले हे मी सांगू शकत नाही.

**<u>उलटतपास कोर्टाच्या अवेळेभावी पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०६/०५/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.